# साईभक्त

## डॉ. केशव भगवंत गव्हाणकर

लेखक : **श्री. चंद्रकांत दामोदर सामंत**



डॉ. अण्णासाहेब

श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व त्यांचा सहवास लाभलेल्या ज्या मोजक्या व्यक्ति श्रीसाईकृपेने आज हयात आहेत त्यापैकी एक प्रमुख भक्त म्हणजे कुर्ल्याचे डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर. चालू महिन्यात अठ्ठावीस तारखेला डॉक्टरसाहेबांच्या वयाला सत्तर वर्षे पुरी होत आहेत, हा एक योगायोगच म्हटला पाहिजे.

अण्णासाहेबांचा जन्म १९०६ साली, ठाणे जिल्ह्यातील इतिहास प्रसिद्ध जंजिरा किल्ल्यानजिकच्या अर्नाळा ह्या गावी शुक्ल पंचमी शनिवार ह्या दिवशी झाला. जन्मल्यानंतर सहाव्या दिवशीची गोष्ट. त्यांच्या आईने झोपेमध्ये कंदिलाची वात समजून चुकून लहानग्या केशवला ज्या पाळण्यात ठेवले होते त्या पाळण्याच्या एका वस्त्राला अंधारातच काडी पेटवून लावली. सबंध पाळण्याने पेट घेतला. पण दैवी कृपेचे लेणे बरोबर घेऊन आलेल्या केशवला काहीही इजा झाली नाही.

प्राथमिक शिक्षण रत्नागिरी जिल्ह्यातील पळ्ळे ह्या गावी तसेच अर्नाळा येथे झाल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी मुंबई येथे आले. मॅट्रिकच्या वर्गात शिकत असताना आण्णासाहेब एकदा लॅमिंग्टन रोडने शाळेतून घरी परतत होते. वाटेतच एका व्हिक्टोरियात श्रीसमर्थसद्गुरु साटम महाराज बसलेले त्यांना दिसले. महाराजांनी त्यांना आपलेकडे बोलावून हातातली बिअरची बाटली त्यांच्या तोंडाला लावली. पण आश्चर्याची गोष्ट की त्याची चव त्यांना पाण्यासारखी लागली. तसेच त्याच वर्षी दुसऱ्या एका प्रसंगी अण्णासाहेबांना एक तत्कालीन संत श्रीवाग्देव महाराज ह्यांचे दर्शन घडले. भेट होताक्षणी "ये बडा नरका लडका है" असे सूचक उद्‌गार महाराजांनी काढले.

अण्णासाहेबांना श्रीसाईनाथांचे प्रथम दर्शन घडले १९१८ साली जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षी. त्यावेळेस ते आपले चुलते श्री. रामचंद्र बळवंत गव्हाणकर ह्यांच्याबरोबर गुरुवारच्या दिवशी शिरडी मुक्कामी सकाळी हजर झाले. श्री. काकासाहेब दिक्षीतांच्या सांगण्यावरून त्यांनी प्रथम श्रीबाबांची धूळभेट घेतली व नंतर ते मशिदीत दर्शनास गेले असता श्रीबाबांनी त्यांना त्यांच्या मातोश्रीने केलेल्या पूर्वीच्या नवसाची आठवण देऊन तो फेडून घेतला. भेटीच्या पहिल्याच दिवशी श्रीबाबांनी अण्णांच्या तोंडात स्वहस्ते केळे भरविले. "मला बाबा तीन दिवस कुशीत घेऊन निजले होते." हा अनुभव सांगताना अण्णासाहेब कृतज्ञतेने सद्गदित होतात. ह्याच भेटीच्या पाचवे दिवशी सकाळी मशिदीत धुनीमाई शेजारी श्रीबाबांच्या हातापायाच्या पट्टया सोडण्याचे नित्याचे काम चालू होते. तितक्यात समोर छोटया केशवला पाहून श्रीसाईनाथांनी त्याला आपल्याजवळ बोलावून घेतले. व एक थप्पड लगावून त्याच्या डोक्यावरील जरीची टोपी दूर उडवून दिली, व नुकत्याच झालेल्या मौजीबंधनामुळे डोक्यावर राखलेल्या शेंडीला धरून त्याचे कपाळ आपल्या पायावर जोराने आपटले. एवढे झाल्यानंतर श्रीबाबांनी त्याच्याकडे "दोन पैसे" मागितले. जवळच उभ्या असलेल्या श्री. माधवराव देशपांड्यांनी केशवचा उजवा हात ओढून तो श्रीबाबांच्या हाती दिला व "दिया" असे म्हटले. श्रीसाईनाथांनी ते "दोन पैसे" स्वतःच्या कफनीच्या उजव्या खिशात कोंबले व त्या प्रसंगाची आठवण म्हणून ती कफनीच नंतर त्यांच्या स्वाधीन केली. ती पवित्र कफनी डॉक्टरसाहेबांनी मोठ्या काळजीपूर्वक सांभाळून ठेविली आहे, व ती त्यांच्या कुर्ला येथील निवासस्थानी आज पहावयास मिळते.

अण्णासाहेबांचे आध्यात्मिक जीवन समृद्ध करण्यास श्रीसाईनाथांप्रमाणेच त्यांचे मोक्षगुरु श्रीगणेशभक्त त्र्यंबक विठ्ठल सामंत ह्यांचेही मार्गदर्शन कारणीभूत झालेले आहे. ते श्रीगणेशभक्त होते व त्याची भक्ति करून त्यांनी त्याला आपलासा करून घेतलेला होता. प्रत्यक्ष श्री गणेशाने स्वतः गणु महाराच्या रूपात येऊन त्र्यंबकेश्वराच्या जंगलात त्यांना दर्शन दिले होते व एकाक्षरी मंत्राचा उपदेश केला होता. आपल्या गुरु माऊलीप्रमाणेच डॉक्टरसाहेब अत्यंत कट्टर गणेशभक्त असून "श्रीगणेशावर कीर्तने करणाऱ्या विद्यमान व्यक्तित डॉ. गव्हाणकर हे एक अधिकारी पुरुष आहेत." असे गौरवपूर्ण उद्‌गार ठाण्याचे सत्पुरुष श्रीगजाननमहाराज उर्फ अण्णासाहेब पट्टेकर ह्यांनी काढले आहेत.

१९३२ साली शिरडीतील श्रीबाबांच्या समाधिसमोर कृतज्ञतेनें लोटांगण घालून डॉक्टरसाहेबांनी आपले सर्वस्व श्रीबाबांना समर्पण केले. गेल्या पंचेचाळीस वर्षांचा इतिहास हा त्यांच्या समर्पित जीवनात एक आनंदाचा ठेवा आहे.

अण्णासाहेबांनी गेले अर्धशतक श्रीसाईबाबांची विविध प्रकारे सेवा केली आहे व वार्धक्यातील शारिरीक अडचणींवर मात करून अद्यापही ती चालू ठेविली आहे. ऑक्टोबर १९७५ मधें शिरडी येथे झालेला कोजागिरी पौर्णिमेचा उत्सव हा त्यांनी साजरा केलेला पंचेचाळीसावा वार्षिक उत्सव होता. दरवर्षी विजयादशमीच्या नंतरचा दिवस कुर्ला येथे मोठ्या धुमधडाक्याने पार पडतो. "भिक्षेची भाकर लई गोड" ह्या श्रीबाबांच्या दृष्टान्तानुसार डॉक्टरसाहेब हा दिवस भिक्षेच्या सामुग्रीवर साजरा करतात.

१९५० ते १९५५ ह्या काळात डॉक्टरसाहेब शिरडीसंस्थानचे अध्यक्ष होते. १९५४ मध्ये दसऱ्याच्या सुमुहूर्तावर शिरडी समाधिमंदिरात श्रीबाबांच्या पुतळ्याची स्थापना डॉक्टरसाहेबांच्या हस्ते झाली. त्यांच्याच कारकीर्दीत शिरडी येथे आज दिसून येत असलेल्या सुधारणांचा पाया घातला गेला. त्याशिवाय १९४८ पासून जवळ जवळ आठ वर्षे अण्णासाहेबांनी "श्रीसाईलीलेचे" संपादन कार्य केले. आजतागायत डॉक्टरसाहेबांचे शंभरावर अभ्यासपूर्ण लेख "श्रीसाईलीला" मासिकात प्रसिद्ध झाले आहेत.

"शिलधी" ह्या नावाची शिरडी स्थानाचे माहात्म्य विशद करणारी एक पुस्तिका पूर्वीच प्रकाशित झाली असून, "शिरडीचे साईबाबा" व "साईबाबा हाच चमत्कार" हे त्यांचे दोन ग्रंथ अत्यंत वाचनीय झाले आहेत. श्रीबाबांच्या समग्र अवताराचे मर्म जाणून घेणाऱ्या भक्तांना ते उद्बोधक ठरतील ह्यात संशय नाही. गेल्यावर्षी जून १९७५ मध्ये सुमारें महिनाभर केलेला परदेशचा विनामूल्य दौरा हा अण्णासाहेबांच्या आयुष्यातील गुरुकृपेचा अत्युत्कट अनुभव होता.

"ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें ।
चित्तीं असों द्यावें समाधान ।।"

ह्या उक्तिचा प्रत्यय आणून देणाऱ्या ह्या आधुनिक संतांचे आतापर्यंतचे जीवन श्रीसाईबाबांच्या कृपाप्रसादामुळे समाधानाने काठोकाठ भरलेले असून त्याचे पडसाद त्यांच्या नम्र वागणुकीत व गोड शिकवणुकीत पदोपदी अनुभवास येतात. डॉक्टरसाहेबांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त त्यांना व त्यांच्या प्रत्येक कार्यात मनोभावे साथ देणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवतींना दीर्घायुरारोग्य लाभो हीच त्या प्रभूच्या चरणी प्रार्थना !

●

# श्री साईबाबांच्या जन्मस्थानाचा शोध

● श्री. व्ही. बी. खेर,

'अलका', १४ वा रस्ता, खार मुं. ५२

(श्री. साईबाबांचा जन्म, जन्मस्थान व त्यांची कौटुंबिक माहिती ह्यांचे गूढ उकलण्याच्या हेतूने श्री. व्ही. बी. खेर व त्यांच्या पत्नी ह्यांनी पाथरी गावास भेट दिली. तेथील लोकांच्या बरोबरील संभाषणात त्यांना ह्या विषयीचे जे धागेदोरे सापडले ते त्यांनी पकडले व त्यांचा पाठपुरावा केला. त्यांना जो एकूण पुरावा मिळाला त्यावरून त्यांना असे वाटते की पाथरी हीच साईबाबांची जन्मभूमि असली पाहिजे व तेथील देशस्थ, यजुर्वेदी ब्राम्हणांच्या भुसारी कुटुंबात त्यांचा जन्म झाला असावा. श्री. खेर ह्यांचा मूळ इंग्रजी लेख श्री. साईलीलेच्या इंग्रजी आवृत्तीत (जानेवारी १९७६) प्रसिद्ध झाला होता त्याचा अनुवाद डॉ. श्री. दि. परचुरे ह्यांनी ह्या ठिकाणी सादर केला आहे.)

"साईबाबा हे हिंदु नव्हते की मुसलमान नव्हते परंतु ते त्या दोघांच्याही वरच्या श्रेणीचे होते." एकदा एका डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या प्रश्नास उत्तर देताना नासीकचे एक प्रसिद्ध वकील व श्रीसाईबाबांचे परमभक्त श्री. एस्. बी. धुमाळ ह्यांनी वरीलप्रमाणे उत्तर दिले होते.'[1] श्री. धुमाळ ह्यांचे हे उत्तर पूर्णतया अर्थपूर्ण आहे ह्यात काहीच संशय नाही. जो मनुष्य परमेश्वराचा अवतार असतो, त्याची जात अथवा त्याचा वर्ण ह्याचा विचार न करता त्याला मान देणे हे योग्यच होय. एका लोकप्रिय मराठी म्हणीप्रमाणे नदीचा उगम व ऋषीचे कुळ ह्यांचा शोध घेऊ नये असे सांगितलेले आहे, ह्या दोहोंचाही अगदी साधा आरंभ पाहिल्यावर संशोधकाची निराशा होण्याचा संभव आहे. ही म्हण कोणत्याही कारणासाठी पडली असली तरी सध्याच्या युगात सर्वच मूल्ये अस्थिर झालेली आहेत. म्हणून "प्रत्येक तत्व व प्रत्येक धर्म बुद्धिच्या व न्यायाच्या कसोटीवर घासून त्याला जागतिक मान्यता मिळवून घेणे आवश्यक आहे."[2] म्हणून काळाच्या वाळूवर ज्यांची पावले उमटलेली आहेत त्या साधुपुरुषांना देखील हाच नियम लागू करणे योग्य होईल. प्रा.

(१) श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी ह्यांचे पुस्तक भक्तांचे अनुभव भाग पहिला, तिसरी आवृत्ति १९६५ पृ. ४८

एरिक एम्. एरिकसन ह्यांचा "गांधींचे सत्य" हा ग्रंथ ज्यांनी वाचला असेल त्यांना वरील विधानाचे महत्व कळेल. साईबाबांचे जन्मस्थान, त्यांनी ज्या कुटुंबात जन्म घेतला ते कुटुंब इत्यादींचा शोध घेतल्याने त्यांच्या आयुष्यातील पुढील हकीकतीची संगती लागेल ह्या विश्वासाने मी माझ्या पत्नीसह १९७५ साली जून महिन्यात मराठवाड्याची यात्रा केली व साईबाबांच्या जन्मस्थानाविषयी मला जी माहिती मिळाली ती प्रस्तुत लेखात दिली आहे; परंतु हे करण्यापूर्वी साईबाबांचे शिर्डीत आगमन, त्यांचा पोशाख, त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवई आणि त्यांचे जन्मस्थान व कुटुंब ह्याबद्दल जी माहिती निरनिराळ्या ठिकाणी दिली आहे ती प्रथम थोडक्यात देतो.



**पाथरीच्या सीमेवरील श्री. हनुमानाचे मंदिर**



**पाथरीतील भुसाऱ्यांचे वंशपरंपरागत घर**

साईबाबांची शरीरयष्टी भरभक्कम होती. ते अजानुबाहू होते. ते मध्यम उंचीचे होते, व त्यांचा वर्ण गोरा असून केतकी रंगाचा होता; परंतु त्यांचे डोळे विशेष पाणीदार असल्यामुळे त्यांची पहिलीच छाप त्यांच्या डोळ्यामुळे पडत असे. त्यांच्या डोळ्यात एवढे तेज होते की त्यांच्या डोळ्याकडे पहाणाऱ्यास असे वाटे की ते आपले मूळातून अवलोकन करीत आहेत.[३] त्यांचे कान टोचलेले होते,[४] आणि त्यांची सुंता केलेली नव्हती[५] ह्यावरुन ते हिंदु असावेत असे अनुमान निघते; परंतु त्यांचा पोशाख एकाद्या फकीरासारखा होता व ते एका पडक्या मशिदीत रहात व तिला ते "द्वारकामाई" म्हणत. मशिदीमध्ये धुनीत कायमचा अग्नि पेटत असे तसेच शंख वाजवून आणि घंटानाद करून ते भक्तांना आपली पूजा करुन देत असत.

(२) मोहनदास करमचंद गांधी "सर्व श्रेष्ठाच्या शोधात" भाग १ ला नवजीवन पब्लीशिंग हाऊस अहमदाबाद १९६१ पृ. १४८.

मशिदीबाहेरील अंगणात तुळसीवृन्दावन होते. त्यांचे हिंदु भक्त रामनवमीचा उत्सव साजरा करीत व साईबाबा त्यात मोठ्या आनंदाने सामिल होत. त्याचप्रमाणे शिरडीतील मुसलमानांनी त्याच दिवशी संदळची मिरवणूक काढण्यास त्यांची काहीच हरकत नसे. त्यांचे नेहमीचे अन्न अगदी साधे असे परंतु त्यांनी इतर सहकारी फकीरांच्या समवेत मांस व मासेही खाल्ले असल्याचे सांगण्यात येते. "अल्ला मालिक" हे शब्द त्यांच्या जिभेवर नेहमीच असत; परंतु राम, कृष्ण, गणेश, शिव, हनुमान अथवा भक्ताचे गुरु ह्या स्वरूपात त्यांनी भक्तांना दर्शन दिल्याचा दाखला आहे. नानासाहेब चांदोरकरांच्या बरोबर त्यांची जी चर्चा झाली तीवरुन त्यांना भगवद्‌गीतेचे सूक्ष्म ज्ञान असावे असे दिसते; परंतु मुसलमानांच्या बरोबर ते कुराणाचा पहिला अध्याय म्हणत असत असा उल्लेख आहे. त्यांना बऱ्याच भाषा अवगत होत्या; परंतु त्यांचा अभ्यास त्यांनी केव्हा केला ह्याची माहिती मात्र कोणीच सांगू शकत नसे. थोडक्यात असे म्हणता येईल की त्यांची घडण जुन्या योग्यांप्रमाणेच झालेली होती; परंतु सुफी पंथाचा फार प्रभाव त्यांच्यावर होता. ह्या ठिकाणी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की एकदा कोर्टात साक्ष देत असताना एका प्रश्नास उत्तर देताना साईबाबांनी असे सांगितले होते की त्यांचा धर्म आहे "कबीर."[६]

श्री साईबाबांचे एक निस्वार्थी भक्त व ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग आपल्या गुरूसाठी केला ते सॉलिसिटर काकासाहेब दीक्षित साईसच्चरित्राच्या प्रस्तावनेत लिहितात, "त्यांचे (साईबाबांचे) जन्मस्थान कोणते व त्यांचे मातापिता कोण ह्याविषयी विश्वसनीय माहिती मिळत नाहीं; परंतु त्यांचे काहीतरी संबंध निजामाच्या संस्थानशी ज्यालाच पुढे हैदराबाद असे म्हणत (आणि राज्यपुनर्रचनेच्या वेळी १९५६ साली आंध्र प्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्र ह्या तीन भाषिक राज्यात ज्याची विभागणी झाली ) त्याशी असावेत असे म्हणता येईल. त्यांच्या बोलण्यात सेलू, जालना, मानवत, पाथरी, परभणी, औरंगाबाद बीड व बिदर इत्यादि शहरांचा नेहमी उल्लेख येई. एकदा एक पाथरीचा

(३) बी. व्ही. नरसिंहस्वामी – भक्तांचे अनुभव भाग पहिला तिसरी आवृत्ति १९६५ पृ. ९२.

(४) दाभोळकर लिखित श्री साईचरित्र आठवी आवृत्ति सन १९७२, सातवा अध्याय.

(५) स्वामी साईशरणानंद श्री साईबाबा (गुजराती) सहावी आवृत्ति. १९६६ पृ. १७.

(६) नरसिंहस्वामीकृत भक्तांचे अनुभव तिसरी आवृत्ति १९६५ पृ. ४६.

मनुष्य शिर्डीला साईबाबांच्या दर्शनाला आला होता, तेव्हा पाथरीच्या बऱ्याचशा प्रमुख नागरिकांची चौकशी साईबाबांनी त्याच्याजवळ केली. त्यावरून असे दिसते की त्यांना पाथरीविषयी विशेष ज्ञान होते; पण त्यावरून असे खात्री-लायक रीत्या म्हणता येत नाही की त्यांचा जन्म पाथरी येथेच झाला असला पाहिजे. त्याचप्रमाणे साईबाबा हे जन्माने ब्राम्हण होते की मुसलमान होते हे ही खात्रीलायकरीत्या सांगता येत नाही."[७]

साईबाबांचे एक जुने भक्त म्हाळसापति असे म्हणत की साईबाबांनी त्यांना एकदा असे सांगितले होते की त्यांचा (साईबाबांचा) जन्म पाथरी येथे एका ब्राम्हण कुटुंबात झाला व लहानपणीच त्यांच्या आईवडिलांनी त्यांना एका फकीराला सुपूर्द केले. साईबाबांनी हे सांगितल्यानंतर थोड्याच दिवसानी पाथरीचा एक मनुष्य काही कामासाठी कोरहळा नावाच्या शिर्डी जवळच्या एका गावी आला होता. तो शिर्डीस आला असता पाथरीच्या बऱ्याच रहि-वाशांची चौकशी त्यांच्या नावनिशिवार साईबाबांनी केली.[८] भगत म्हाळसापति हा सत्यवक्ता होता व त्याच्या वैराग्यामुळे श्री साईबाबासुद्धा त्याला फार मान देत असत. त्यामुळे त्यांचे म्हणणे महत्वाचे व संशयातीत म्हणता येईल.[९]

आपल्या आईवडिलांविषयी कोणतेही प्रश्न विचारलेले साईबाबांना रूचत नसत. ते म्हणत की, "पुरुष हे माझे वडील व माया ही माझी आई आहे." आयुष्यभर संशोधन करणाऱ्या साईबाबांच्या एका चरित्रलेखकाने असे म्हटले आहे की, "साईबाबांचा जन्म हे गूढच आहे आणि त्याबद्दल प्रत्यक्ष ज्ञान असलेला एकही मनुष्य मला भेटलेला नाही."[१०]

श्री. वामन प्राणगोविंद पटेल, सॉलिसिटर ह्यांनी १९५३ साली संन्यास घेतला आणि त्यावेळेपासून त्यांना स्वामी साईशरण आनंद असे म्हणतात. ह्यांचा शब्दही ह्याबाबतीत महत्वाचा मानला पाहिजे. सॉलिसिटर पटेल ह्यांनी स्वीकारलेल्या नव्या नावावरूनच त्यांना साईबाबांच्या बद्दल किती आदर व भक्ति वाटत आहे ते स्पष्ट होते. प्रस्तुतच्या विषयाबद्दल त्यांनी गुजराती भाषेत लिहिलेल्या साईबाबांच्या चरित्रात काय लिहिले आहे ते तपासणे आव-श्यक आहे."[११]

---

(७) श्री. दाभोळकर लिखित साईसच्चरित आठवी आवृत्ति १९७२ श्री. दीक्षित यांची प्रस्तावना पृ. १.

(८) संकीर्ण लेख श्री. साईलीला एप्रिल १९२५ पृ. १७९

(९) बी. व्ही. नरसिंहस्वामीकृत साईबाबांचे चरित्र भाग पहिला पृ. १३–१४.

श्री. वामनराव पटेल ह्यांचा जन्म १८८९ साली झाला व ते आज-
ीस ह्यात आहेत. १९१० साली मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजातून तत्त्वज्ञान
विषय घेऊन ते बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले, व १९१२ साली एल.
. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच त्यांनाही परमे-
ाचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची इच्छा होती. ह्याकरिता ते पुष्कळ साधूंना
ले; परंतु त्यांची इच्छा कोणीच पुरी करू शकला नाही. शेवटी त्यांच्या
ालांनी साईबाबांना भेटण्याचा सल्ला त्यांना दिला व त्याप्रमाणे १९११
ी ते रेल्वेने मुंबईहून कोपरगावास आले व तेथून टांग्याने शिरडीस आले.
शिरडीला पोचले त्यावेळी साठे वाड्याजवळील कडुलिंबाच्या झाडाखाली
ईबाबा उभे होते. टांगेवाल्याने पटेलना साईबाबांकडे बोट दाखविल्यावर,
ल तात्काळ टांग्यातून उतरले व त्यांनी साईबाबांना साष्टांग नमस्कार
ला. आणि काय आश्चर्य ! साईबाबा पटेलना म्हणाले, "परमेश्वर आहे.
नाहीं असे तू का म्हणतोस ?" साईबाबांशी झालेल्या स्वतःच्या पहिल्या
ीचा समग्र वृत्तान्त श्री साईशरण आनंद ह्यांनी प्रस्तुत लेखकास सविस्तर
ेदन केला. त्या १९११ साली कडुलिंबाच्या झाडाखाली झालेल्या मुलाखतीने
. पटेल यांचे समग्र आयुष्यच बदलून गेले. श्री. पटेल ह्यांच्या मनातील
ं संदेह पूर्णपणे नष्ट झाले आणि त्यांना वाटले की ज्यांचा सद्गुरू म्हणून
ीकार करावा असा गुरू आज आपणास मिळाला आहे आणि त्याला आपण
पले सर्वस्व अर्पण केले पाहिजे. पुढे १९१३ च्या उन्हाळ्याच्या सुटीत श्री.
ल शिर्डीस आले असता त्यांना साईबाबांनी चांगले अकरा महिने ठेवून
ले आणि शेवटी एक दिवस परवानगी न मागताच बाबांनी ती त्यांना दिली.
ा शिरडी येथील दीर्घ मुक्कामात साईबाबांनी त्यांना भिक्षा मागण्यास
ठविले आणि मोठ्या प्रेमाने "बाबू" असे टोपण नाव त्यांना ठेविले. ह्या
ुक्कामात श्री. पटेल ह्यांचा साईबाबांशी अत्यंत निकट असा संबंध
ला. पुढे यथावकाश श्री. पटेल हे सॉलिसिटरची परीक्षा उत्तीर्ण झाले व
व्यवसाय करू लागले. परंतु त्यांना खरी आवड आध्यात्मिक गोष्टींबद्दलच
ती. श्री. पटेल ह्यांनी सस्तु साहित्य वर्धक कार्यालयासाठी विपुल लेखन
े आहे. त्याचप्रमाणे त्यांनी मूळ मराठी साई सच्चरित्राचा साध्या व सरळ
ाषेत गुजरातीत अनुवाद केला आहे. साईबाबांच्या बद्दल ज्याला आस्थापूर्वक

(१०) बी. व्ही. नरसिंहस्वामी कृत साईबाबांचे चरित्र भाग पहिला
. १३–१४.

(११) स्वामी साईशरणानंद लिखित साईबाबा यांचे चरित्र ६ वी
ावृत्ति सन १९६६.

अभ्यास करावयाचा आहे त्याने श्री. पटेल ह्यांनी लिहिलेले साईबाबांचे चरित्र नजरेखालून घालणे अत्यंत आवश्यक आहे.

स्वामी साईशरणआनंद ह्यांच्याबद्दल इतकी प्रास्ताविक माहिती दिल्यानंतर त्यांनी साईबाबांबद्दल काय सांगितले आहे त्याकडे वळू. ते म्हणतात की ही गोष्ट वादातीत आहे की श्रीसाईबाबा स्वतःला ब्राम्हण मानीत व जर केव्हा कोणी ते ब्राम्हण नसल्याचे सुचविले तर ते त्यावर नाराज होत. १९११ साली श्री. पटेल ह्यांच्या वडिलांना जलोदर झाला व त्यातून ते बरे होण्याची शक्यता नव्हती. त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात श्री. पटेल शिर्डीला आले होते. त्यांच्या मनातले विचार साईबाबांना तात्काळ कळले व त्यांनी पटेल ह्यांना आपल्या वडिलांना शिर्डीस घेऊन येण्यास सांगितले; परंतु लगेच दुसऱ्या क्षणी त्यांच्या मनात विचार आला की ह्याचे सनातनी वडील मुसलमानासारख्या दिसणाऱ्या माझ्याकडे येतील का ? आणि म्हणून बाबा लगेच म्हणाले, "मी ब्राम्हण आहे. नाही का ?" स्वामिजींनी हे लिहिले की बाबांचा सर्वात जुना भक्त जो म्हाळसापति त्याला बाबांनी स्वतःच हे सांगितले होते की त्यांचा जन्म पाथरी येथील एका देशस्थ यजुर्वेदी ब्राम्हण घराण्यात झाला व लहानपणीच त्यांना एका फकीराकडे सुपूर्द करण्यात आले होते.

श्री साईलीला मासिकाच्या जुलै ते सप्टेंबर १९४२ च्या अंकात पृ. ३५१ ते ३७२ मध्ये सुनाम्र सुंदर ह्यांनी साईबाबांच्या जन्माबद्दल एक लेख लिहिला आहे. प्रस्तुत लेखकाला ती माहिती माधवनाथ नावाच्या साधूपुरुषाने सांगितली, असे त्याचे म्हणणे आहे. त्या लेखाचा सारांश साईशरणआनंद ह्यांनी जे साईबाबांचे चरित्र लिहिले आहे त्याच्या सोळाव्या पानावर आहे. त्या लेखात असे म्हटले आहे की, पाथरी येथील एका देशस्थ यजुर्वेदी ब्राम्हणास तीन मुलगे होते. त्यापैकी सर्वात वडील मुलगा म्हणजेच साईबाबा होत. ज्यावेळी साईबाबा पाच वर्षांचे होते त्यावेळी त्या ब्राम्हणाकडे एक फकीर आला व त्याला म्हणाला, "माझे मला परत दे." त्यावर ब्राम्हणाने उत्तर दिले, "माझ्याजवळ असलेले सर्व तुमचेच आहे." त्यानंतर त्या फकिराने त्या ब्राम्हणाच्या मोठ्या मुलासाठी मागणी घातली व त्याला घेऊन तो निघून गेला. चार वर्षांनी तो फकीर परत आला आणि त्या ब्राम्हणाच्या संमतीने त्याने त्या मुलाला पुन्हा आणखी तीन वर्षांसाठी नेले. वयाच्या बाराव्या वर्षापासून

(१२) परम साईभक्त श्री साईशरणानंद हा सप्टेंबर १९७५ च्या साईलीला मासिकातील श्री. सदानंद चेंदवणकर ह्यांचा लेख पृ. ४ ते ६.

(१३) स्वामी शरणानंद लिखित श्री साईबाबा ६ वी आवृत्ति १९६६ पृ. १४–१५.]

अठराव्या वर्षापर्यंत साईबाबा गुप्त होते व ज्यावेळी ते शिरडीला कडुलिंबा-खाली प्रगट झाले त्यावेळी त्यांचे वय एकोणीस वर्षांचे होते.

सत्य साईबाबा आपणास शिरडीच्या साईबाबांचे अवतार म्हणून समजतात. त्यांच्या चरित्रात आणखीच निराळी कथा आढळते. स्वामी साईशरणानंद साईबाबांच्या चरित्रात पृ. १३ व पृष्ठ २७–२८ वर त्या कथेचा उल्लेख करतात. साईबाबांचे आईवडील पाथरीचे रहिवासी असावेत असे दिसते. त्यांच्या वडिलांचे नाव गंगाभव व आईचे नाव देवगिरी अम्मा होते. ते जोडपे फार धार्मिक वृत्तीचे असून शंकराचे भक्त होते. त्यांना अपत्य नसल्यामुळे ती फार दुःखी असत; परंतु त्यांनी शंकराची मनोभावे उपासना केली व त्याचेकडून वर मिळविला. त्याप्रमाणे शंकराने त्यांच्या कुळात साईबाबांच्या रूपाने जन्म घेतला. दिवसेदिवस गंगाभव तपामध्ये अधिकाधिक मग्न होऊ लागले व त्यांनी संसारत्याग करावयाचे ठरविले. देवगिरीअम्मांनीसुद्धा त्यांचेबरोबर जाण्याचा हट्ट धरला. त्याप्रमाणे साईबाबांना एका झाडाखाली टाकून देऊन ती दोघेही अरण्यात निघून गेली. त्या बाजूने जाणाऱ्या एका फकिराच्या दृष्टीस ते मूल पडले व ती एक अल्लाची देणगी आहे असे समजून त्या मुलाला त्यांनी आपल्या बरोबर घेतले व वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत त्या मुलाचा सांभाळ केला. पुढे तेथील एका जमीनदाराच्या मुलाबरोबर झालेल्या सामन्यात साईबाबांनी एक शिवलिंग जिंकले व ते त्याबरोबर खेळतात ह्या सबबीवर स्थानिक मुसलमानांनी साईबाबांना घालवून देणे भाग पाडले. त्यानंतर साईबाबा गोदेच्या तीरावर भटकू लागले व कालांतराने औरंगाबादेस पोचले. त्या ठिकाणी धुप-खेडच्या चांद पाटलाशी त्यांची ओळख झाली व त्याची घोडी त्याला साईबाबां-च्या कृपेने मिळाली. ह्यानंतरचे साईबाबांचे चरित्र सर्वांना विदित आहेच.

अशा प्रकारे साईबाबांचा पाथरीशी संबंध असावा असे ठरवून आम्ही पाथरीला जाण्याचे ठरविले; परंतु ज्यावेळी आम्ही तो निर्णय घेतला त्यावेळी आम्हांला पाथरीची फारच थोडी माहिती होती. पाथरी गावाचा जो इतिहास पुढे दिला आहे तो दख्खनच्या मध्ययुगीन इतिहासाची माहिती असणाऱ्या एका तज्ज्ञाकडून मिळविलेला आहे.

सध्याच्या पाथरी गावाला मध्ययुगीन कालात पार्थपूर म्हणत असत. हे देवगिरीच्या आग्नेयेस सुमारे ८० ते ८५ मैल दूर आहे व विदर्भ (मंगाले) आणि गोदावरी ह्या नद्यांच्या संगमापासून नैऋत्य दिशेस सुमारे दोन मैलावर वसलेले आहे. हा भाग विदर्भाच्या राज्यात मोडत असे व त्यावर देवगिरीच्या

यादवांची सत्ता होती. पाथरी हे गणिती लोकांचे एक मोठ केंद्र होते.[१४] पाथरी हे यादवांच्या राज्यात मोडत असल्यामुळे त्याचा इतिहास देवगिरी अथवा दौलताबादेच्या इतिहासाशी निगडित आहे. बहिरू उर्फ भैरव कुलकर्णी (चौधरी) हा १४४० (इ. स.) च्या सुमारास विजयनगरच्या राजाच्या नोकरीत असावा. त्याला ब्रहामनी राजाच्या सैन्याने पकडून बेदरला आणले. तेथील सुलतानाने त्याची हुषारी पाहून त्याला आपल्या नोकरीत घेतले, व बाटवून मुसलमान बनविले. भैरव आता मलिक हसन बनला व कालांतराने वर चढत गेला. त्याला मग "निझाम-उल्-मुल्क" ही पदवी देण्यात आली व बहामनी राज्यातील एका सुभ्याचा सुभेदार नेमण्यात आले. पुढे ज्यावेळी बहामनी राज्याची पाच शकले झाली त्यावेळी मलिक हसनचा मुलगा अहमद ह्याने १४८९ त अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना केली. अखेरीस मोंगलांचा दक्षिणेतील सुभेदार निझाम ह्याने दौलताबादेच्या आसपासच्या मुलुखावर आपला अंमल बसविला आणि पाथरीचाही समावेश त्याच राज्यात झाला. तेव्हापासून पाथरी हे एक तालुक्याचे ठिकाण आहे.

मनमाड शिकंदराबाद रेल्वे लाईनवरील मानवतरोड स्टेशनपासून पाथरी १० ते १२ मैलावर आहे. साईबाबांच्या लहानपणासंबंधीची खात्रीलायक माहिती मिळविण्यासाठी ज्यावेळी आम्ही १९७५ च्या उन्हाळ्यात काही दिवस पाथरीला रहाण्याचे ठरविले त्यावेळी पूर्वनियोजित खुनांच्या सत्रामुळे मानवत प्रसिद्धिच्या झोतात होते. श्री. दिनकर वासुदेव चौधरी हे पाथरी गावातील प्रसिद्ध चौधरी घराण्याचे एक वंशज आहेत. ह्या घराण्याच्या मागे दीर्घ इतिहास आहे. श्री. दिनकरराव चौधरी हे एक प्रगतीशील शेतकरी असून वकीलही आहेत. आमचा मुक्काम त्यांच्याकडेच होता. त्यांनी आमचे आदरातिथ्य व्यवस्थित केलेच शिवाय आमचे हे कार्य हे आपले स्वतःचेच कार्य आहे असे समजून आम्हांला सर्वतोपरी मदत केली.

चौधरी कुटुंबाच्या पुष्कळ शाखा पाथरी गावात आहेत परंतु तेथे असलेल्या चौदाव्या शतकात बांधलेल्या एका किल्ल्यातच त्यातील बहुतेक रहातात. श्री. दिनकरराव चौधरी ह्यांनी आता सदरील किल्ल्याच्या बाहेर घर बांधले आहे व हल्ली ते तेथेच रहातात. पाथरीच्या मुक्कामात त्याच घरात आम्ही रहात होतो. दि. २१ जूनला संध्याकाळी आम्ही सहज गप्पा मारीत घराच्या पडवीत बसलो असता दिनकरराव म्हणाले, "बऱ्याच वर्षांपूर्वी माझे वडील वासुदेवराव

(१४) एस्. बी. दीक्षित ह्यांचा भारतीय खगोलशास्त्राचा इतिहास दुसरी आवृत्ति १९३१ पृष्ठे २६७, २६९ व २७८.

हे भाऊ भुसारी ह्या नावाच्या गृहस्थाकडे बोट दाखवून मला म्हणाले, "पहा काय ही वाईट स्थिति झाली आहे साईबाबांच्या वंशातील लोकांची!" दुसऱ्या दिवशी दिनकररावांचे काही मुसलमान अशील त्यांचेकडे आले होते ते म्हणाले की त्यांच्या माहितीप्रमाणे साईबाबांचा जन्म पाथरी येथील एका ब्राम्हण कुटुंबात झाला होता; परंतु ते लहान असतानाच त्यांना एक फकीर घेऊन गेला होता, पण पुढे काय झाले ते मात्र त्यांना ठाऊक नाहीं. ह्या त्यांच्या बोलण्यामुळे ह्या प्रकरणातील आणखी एक धागा आमच्या हाती आल्याप्रमाणे झाला होता. म्हणून पाथरी गावातील सर्व ब्राम्हण कुटुंबाची यादी करण्याच्या मार्गाला आम्ही लागलो. पाथरी गावातील सर्व ब्राम्हण देशस्थ आहेत. त्यातील काही ऋग्वेदी तर काही आहेत यजुर्वेदी. ह्याशिवाय अन्य कोठल्याही पोट-भेदाची ब्राम्हण कुटुंबे पाथरी गावात नाहीत. आम्ही घरोघर हिंडून ही माहिती गोळा केली तेव्हा असे कळले की ह्या ब्राम्हण कुटुंबापैकी बहुतेकांचे कुलदैवत माहूरची रेणुकादेवी किंवा आंबेजोगाई येथील योगेश्वरी हे आहे. ह्याला अपवाद फक्त एकच दिसला तो म्हणजे भुसारी कुटुंबाचा. हे कुटुंबही देशस्थ यजुर्वेदीच आहे; पण त्यांचे कुलदैवत मात्र पाथरी गावाच्या सीमेवर कुंभारवाडीत असलेला हनुमान हे आहे. ही गोष्ट कळल्यावर आमच्या विचारांना अगदी नवीन दिशा दिसली. श्रीराम व हनुमान ह्यांच्याबद्दल साईबाबांना वाटणारा आदर व भक्ति ह्यांची आठवण होऊन आम्ही म्हणालो, "आमच्या संशोधनास अखेरीस फळ प्राप्त होणार असे दिसते." तात्काळ आम्ही वैष्णव गल्लीत गेलो व भुसारीच्या पडक्या घराचे अवशेष (घर क्रमांक ४–४३८–६१) अत्यंत आदरपूर्वक पाहिले आणि पंचवावडी येथील हनुमानाच्या दर्शनास गेलो. पाथरी गावाच्या सीमेवर लेंडी ह्या नावाची नदी आहे व तीवरून शिर्डीच्या लेंडीबागेची आठवण झाली. ह्या दोहोतील साम्य खासच लक्षणीय आहे. मराठवाड्यामध्ये सर्वसाधारणपणे ज्या प्रकारची मराठी भाषा बोलली जाते त्यात आणि साईबाबांच्या मराठी भाषेतही पुष्कळच साम्य आहे. मराठवाड्यातील सर्व उच्च व नीच जातीतले लोक एकच भाषा बोलताना आढळतात.

पाथरीची सध्याची लोकसंख्या सुमारे १०,००० आहे; परंतु तेथे सुधार-णेचा लवलेशही नाही. ते काही शतकापूर्वी होते तसेच आहे. अलीकडील काही वर्षात तेथे वीज आली आहे व एस्. टी. च्या बसमुळे ते अन्य गावाशी जोडले गेले आहे. त्या ठिकाणचे जीवन पुराणकाळी असेल तेवढेच अजूनही संथ आहे. माझे मन बाबांच्या जन्मकाळाचा विचार करू लागले. परंतु त्यांच्या जन्माचे वर्षही निश्चितपणे कोणालाच माहीत नाहीं. त्याचप्रमाणे ते शिर्डीला केव्हा

आले ह्याबद्दलही मतभेद आहेत. साईसच्चरित्राप्रमाणे ते प्रथम शिर्डीला १८५४ साली आले. नंतर गुप्त झाले व पुन्हा १८५८ साली आले व तेव्हापासून शिर्डीतच स्थायिक झाले; परंतु श्री नरसिंहस्वामी[१५] व श्री. एम्. डब्ल्यु प्रधान[१६] असे म्हणतात की साईबाबा शिर्डीत प्रथम आले ते १८७२ साली. पंधरा ऑक्टोबर १९१८ ला त्यांचे महानिर्वाण झाले हे मात्र सर्वमान्य आहे आणि त्यांचे जे फोटो उपलब्ध आहेत त्यावरुन त्यांच्या वयाचे अनुमान तेवढेच आपण करू शकतो.

तर मग साईबाबांचा जन्म पाथरी येथील भुसारी कुटुंबात झाला ह्याबद्दल आपण कितपत खात्रीने सांगू शकतो ? पाथरी येथील एका प्रसिद्ध नागरिकाने ह्या विषयीची माहिती आपल्या मुलास सांगितली त्याशिवाय अन्य काही पुरावा उपलब्ध आहे का ? हा पुरावा गोळा करण्यासाठी ह्या गोष्टीचा पाठपुरावा करण्याचे मी ठरविले. प्रा. रघुनाथ महारुद्र भुसारी ह्यांच्याशी मी पत्रव्यवहार सुरू केला. पाथरी येथील घराचे तेच सध्याचे मालक आहेत. प्रारंभी ते उस्मानिया विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक होते नंतर ते सरकारी महाविद्यालयाचे प्रिन्सिपॉल झाले व त्याच जागेवरुन सुमारे सोळा वर्षापूर्वी सेवानिवृत्त झाले. हल्ली ते हैदराबाद येथे स्थायिक झाले आहेत. त्यांचा जन्म पाथरी येथे झाला व तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षणही झाले. ते आठ वर्षांचे असताना त्यांचे वडिल मृत्यु पावले. बाराव्या वर्षी त्यांनी पाथरी सोडले व त्यावेळचे जिल्ह्याचे ठिकाण परभणी येथे ते पुढील शिक्षणासाठी गेले. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते हैदराबादला गेले व तिसऱ्या क्रमांकाने बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. ह्यामुळे त्यांना कलकत्ता विद्यापीठाची एम. ए. साठी शिष्यवृत्ति मिळाली व तीही परीक्षा ते चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाले. प्रो. भुसारी ह्यांनी सांगितले की त्यांच्या पूर्वजांपैकी आज ज्ञात असलेला सर्वात जूना पुरुष म्हणजे कोनेर दादा हा होय. त्यानंतरच्या दोन पिढ्यांची माहिती उपलब्ध नाहीं. परंतु त्यानंतरच्या तीन पिढ्यांचा जो वंशवृक्ष मिळतो तो पुढीलप्रमाणे :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | परशुराम | | | |
| रघुपति | दादा | हरिभाऊ | अंबादास | बळवंत | |
| महारुद्र | | परशुरामभाऊ | | | |
| रघुनाथ | | भाऊ | | | |

(१५) बी. व्ही. नरसिंहकृत् साईबाबांचे चरित्र भाग १ ला पृ. १३

(१६) एम्. डब्ल्यू. प्रधानकृत शिर्डीचे साईबाबा सातवी आवृत्ति १९७३ पृष्ठ २५

प्रो. भुसारी ह्यांनी आणखी असे सांगितले की त्यांच्या आजीने त्यांना पूर्वी असे सांगितले होते की हरीभाऊ, अंबादास व बळवंत हे पाथरी गाव कायमचेच सोडून गेले होते. ह्यांपैकी हरीभाऊ हे परमेश्वराच्या शोधासाठी गेले असले तरी इतर दोघे मात्र पैशाच्या शोधासाठीच गेले होते. पुढच्या पिढीतील परशुरामभाऊंनी देखील मंजार्थ ह्या ठिकाणी संन्यास घेतल्याचा दाखला मिळतो. हे ठिकाण बीड जिल्ह्यातील गोदावरी व सिंधुफेना ह्या नद्यांच्या संगमावर आहे. परशुरामभाऊंचा मुलगा भाऊ हा फारसा शिकलेला नव्हता व तो गरिबीतच मेला. श्री. वासुदेवराव चौधरी हे आपला मुलगा दिनकरराव ह्यांच्याजवळ ज्याबद्दल बोलले होते तो हाच भाऊ होय. पाथरी येथील भुसारी कुटुंबात बरच्या थराची व आध्यात्मिक विचारांची माणसे जन्म पावली होती हे दाखविण्यास एवढा पुरावा पुरेसा आहे असे वाटते. मग पाथरी येथील भुसारी कुटुंबातील हरिभाऊ हे तर साईबाबा असावेत का ?

येथवर मांडलेले प्रमेय कदाचित संभवनीय असे आहे. ह्याची चर्चा एका अनुभवी वकीला बरोबर व एका प्रसिद्ध इतिहास तज्ञाजवळ मी केली त्यावेळी त्यांनी असे मत व्यक्त केले की हे शक्य कोटीतील आहे. म्हणून मी आता ह्याबद्दल अधिक काही न लिहिता ह्यातील सत्यासत्य शोधून काढण्याचे काम वाचकांवर सोपवितो. हा लेख लिहित असताच मला असे कळले की पाथरी गावातील रहिवाशांची अशी इच्छा आहे की ते भुसारीचे घर विकत घ्यावे आणि तेथे साईबाबांचे काहीतरी स्मारक उभारावे. त्यांच्या प्रयत्नास यश येवो अशी इच्छा मी व्यक्त करतो. ●

# जीवदान देणारे साईनाथ महाराज

● सूर्यकांत माधवराव गर्जे

८० शिवाजीनगर, पुणे ५

गुरुवारचा दिवस. सायंकाळची वेळ. श्रीसाईनाथ मंदीरात अनेक भक्त जमले होते. त्यात बरेचसे दर गुरुवारी नियमीतपणे येणारे भक्त होते. एक चेहरा मला नवीन दिसला. तशी व्यक्ति भारदस्त व सुशिक्षित दिसत होती. या व्यक्तिला पूर्वी कधी कुठे पाहिल्याचे स्मरत नव्हते म्हणून थोडीशी जिज्ञासा जागृत झाली. मी त्यांच्याजवळ जाऊन ओळख करून घेतली. त्याचे नाव श्री. वाकोडकर. नागपूरचे रहिवासी. सरकारी कामासाठी पुण्यात आले. ऑफिस

सवीत एका मित्राला घेऊन मंदिरात आले. पत्ता शोधायला त्रास पडला परंतु अखेर मंदीर सापडले आणि थकवा नाहीसा झाला.

श्री. वाकोडकरांना काही विचारण्यापूर्वीच ते मला सांगू लागले. –

"१९५८ सालची गोष्ट. असाच काहीं कामानिमित्त मी पुण्याला आलो होतो. काम झाल्यावर मी पुन्हा नागपूरला निघालो तेव्हा खडकी येथील माझ्या एका मित्राने मला एक श्रीसाईनाथ महाराजांचा फोटो दिला. मी तो घरी घेऊन आलो व भिंतीवर टांगून ठेवला. तसा त्यावेळी मी काहीं साई-भक्त नव्हतो. तशी श्रीसाईबाबांची मला फारशी माहिती पण नव्हती. मित्राने प्रेमाने दिलेला एका दैवताचा फोटो. एव्हढीच मनात भावना. परंतु हेच दैवत आज आराध्य दैवत म्हणून मी नित्य पूजीत असतो हे घडले कसे, त्याला कारणही तसेच जबरदस्त आहे.

माझी पत्नी एकदा आजारी पडली. आजार किरकोळ असावा असे वाटून थोडेसे दुर्लक्ष झाले. एके दिवशी अचानक तिला जुलाब होऊ लागले आणि ती अंथरूणाला खिळून पडली. त्या दिवशीची रात्र ही काळ-रात्र ठरणार होती. त्याची आठवण झाली की, अजूनहि अंगावर काटा उभा रहातो. रात्रीचा एक वाजलेला होता. पत्नी बेशुद्धावस्थेत पडून होती. लहान लहान तीन मुलींचे चेहरे केविलवाणे दिसत होते. तीन महिन्याचा मुलगा माझ्या मांडीवर गाढ झोपला होता. काय करावे काही सुचत नव्हते. भाऊ म्हणाला "मी डॉक्टरांना घेऊन येतो." ५।१० मिनिटातच डॉक्टर आले. पत्नीस तपासताच त्यांचा चेहरा गंभीर झाला. माझ्या तर डोळ्यात टचकन् पाणी आले. डॉक्टर म्हणाले –

"यांना दवाखान्यात नेले पाहिजे." भावाने अँबुलन्स मागविली व पत्नीला घेऊन सर्वजण दवाखान्यात गेले. मी तीन महिन्याच्या मुलाला घेऊन घरीच राहिलो. माझा पुरता धीर खचला होता. डोळ्यापुढे काजवे चमकत होते. पायाखालची जमीन सरकत आहे असा भास होत होता. मी व्हरांड्यात येऊन बसलो. आकाशाकडे बघत, शून्यात नजर लावून.

मध्यरात्रीची वेळ. जिकडे तिकडे शुकशुकाट. रातकिड्यांचा किर्र आवाजहि भयानक वाटू लागला. तेव्हढ्यात रस्त्यावर एक कुत्रे केकाटू लागले. मला तो अपशकून वाटला मी मनातून खूपच भेदरलो होतो. इतक्यांत टेलिफोनची घंटा घणघणली. मी पटकन् खोलीत जाऊन फोन उचलला. फोन हॉस्पिटलमधून आला होता. "तब्बेत सिरियस आहे."

अचानक मला आठवण झाली. खडकीच्या मित्राने एक श्रीसाईबाबांचा फोटो दिला आहे. मी उठलो. एक उदबत्ती पेटवली. श्रीबाबांना दाखवली.

दोन्ही हात जोडून नमस्कार केला, आणि माझ्या डोळ्यातून घळाघळा अश्रुधारा वाहू लागल्या. क्षण दोन क्षण गेले नसतील तोच मी पुन्हा एक उदबत्ती पेटवली श्रीबाबांना दाखवली व डोळे पुसू लागलो. इतक्यात दार खटखटले. थोड्याशा जड पावलांनी जाऊनच मी दार उघडले. दारात भाऊ उभा होता. तो म्हणाला, "वहिनींची तब्येत सुधारत आहे !"

पुन्हा एकदा डोळ्यांच्या कडा आसवांनी भरून आल्या. मी थरथरत्या नजरेने श्रीबाबांच्याकडे पाहिले. बाबांच्या ओठावर हसू रेंगाळत होते.

पत्नी आजारातून उठली आणि माझ्याप्रमाणे ती सुद्धा श्रीबाबांची एकनिष्ठ भक्त झाली. माझी खात्री आहे श्रीबाबांनीच माझ्या पत्नीला जीवदान दिले. ●

# मृत्यु आणि बाबा

**लेखक : कै. बी. आर. काकडे**

तावडेवाडी, स्टेशनसमोर, दहीसर पश्चिम, मुंबई ४०००६८



**बी. आर. काकडे**

शके अठराशे चाळीसात — दक्षीणायत प्रथम मासात— विजया-दशमी शुक्ल पक्षात दिवसा देहांत बाबांचा ॥ नऊ तारीख मुसलमानी — कत्तलची रात्र तया दिनी तिसऱ्या प्रहरी साईनाथांनी केली निर्याणी तयारी ॥

याप्रमाणे श्रीसद्‌गुरु साईबाबांनी देहाचे समर्पण करून "मृत्यू" या शब्दाची "खुण" सर्व भक्त मंडळीस पटविली. कोणी कितीही मोठा संत–महंत–परम आनंदव्रत असला तरी व जरी तो निर्गुण निराकार परमात्म्या जवळ जावून पोहोचला असला तरी "पंच महाभूती" शरीरास विसर्जन करावे लागते व तेही "निसर्गाचे" नियमाप्रमाणे.

श्री सद्गुरु साईबाबा नेहमी आपले भक्त मंडळीस सांगत – "नित्य मी जीवंत – जाणा हेचि सत्य – नित्य घ्या प्रचीत अनुभवे ।। व भक्त मंडळीही एक निश्चयाने श्री साईबाबांवर पूर्ण विश्वास ठेवून अद्यापही "बाबा" वरील त्यांचे वचनाप्रमाणे "जीवंत" आहेत याची प्रचिती घेत असतात. मग मृत्यु म्हणजे काय ? हा एक मोठा प्रश्न आम्हा भक्त मंडळीस भेडसावित आहे. आम्ही भक्त मंडळी श्रीसद्गुरु साईबाबांचे इतके जवळ आहोत कीं आम्ही आम्हास "बाबामय" झालोत असे समजतो परंतु त्याचवेळी "मृत्यु" हा शब्द डोळ्यापुढे उभा राहिला म्हणजे "मृत्यु आणि बाबा" यावर आम्ही एकसारखे विचार करू लागतो व नाना प्रकारचे तर्कवितर्क करीत बसतो.

तर्क वितर्काचे घोडे चालले किती आपणा पुढे – तेथे माझे बापुडे शब्द टिकतील कोठूनी -- याची – या वचनोक्तीची मनास चाहूल लागते व आमचे विचार अनंत रंग तरंग या न्यायाने नाहीसे होत जातात. कारण कंदीलात तेल व वात आहे पण काडी पेटवून लावल्या शिवाय कंदील जसा प्रकाशमान होऊ शकत नाहीं तद्वत – मनुष्याजवळ "मृत्युरूपी" सुख आहे व ते भोगण्याची इच्छा पण आहे परंतु सद्गुरुच्या मार्गदर्शना शिवाय त्यास (मनुष्याला) सुखरूप होता येत नाही व म्हणूनच तो तर्क वितर्कात पुन्हा मग्न होण्याचा प्रयत्न करतो व "मृत्यु आणि बाबा' या विषयावर तो अखेरचा निर्णय घेऊ शकत नाही.

यावर श्रीसाईबाबा काय सांगतात. हे भक्त जनहो ! तुम्ही मजकडे काहींना काहीं कारणपरत्वे येता. मग त्या कारणासाठी शिरडी येथे माझे मूळ स्थान आहे तेथे येता किंवा ज्या ज्या भक्त मंडळीकडे माझी तन–मन–धने करून एकाग्र चित्ताने षोडषोपचार पूजा–प्रार्थना–आरती–आदेश–प्रसाद होतात त्या ठिकाणी आपापली गार्‍हाणी सांगण्यासाठी जाता व मला मागणे घालता परंतु तुमच्या पैकी एकहीजण "मृत्युरूपी" सुखाबद्दल एकदाही शंका कुशंका विचारीत नाही याचे मला मोठे आश्चर्य वाटते व म्हणूनच मी आपणा सर्व भक्तमंडळीस पूर्ण ज्ञान देत आहे.

जो सर्वेश्वर – सर्व अंतरात्मा सर्वज्ञ आणि सर्वमय आपल्या स्वईच्छेनें "विश्वरूप" धारण करून उत्पत्ति, स्थिति, लय व क्रीडा करण्याकरिता "माया" रूपाने प्रवृत्त झाला आहे तो "मानव" प्राण्याला "मृत्यु" या शब्दांचे जाणीवे पासून दूर ठेवीत असतो. कारण जन्माच्या क्षणापासून मरण कालापर्यंत "जीवाची जीवनयात्रा मृत्यु मुखात चालू असते. कोणत्याक्षणी आयुष्याचा तंतू तुटेल आणि "मृत्यु आपल तोंड बंद करील याचा नेम नाही. जीव उत्पन्न होतो हेच त्याच्या मृत्युला उत्पन्न करतो. आपल्या बर्‍या वाईटास दुसरा कोणी

जबाबदार नसून आपले आपणच आहोत हे जेव्हा मनुष्याला लक्षात पूर्णपणे येते तेव्हाच तो सावध होतो किंवा सावध होण्याचा प्रयत्न करतो व योग्य मार्गाला लागे पावेतो त्याला गोते खावे लागतात.

आज किंवा उद्या किंवा काही दिवसानी किंवा काही वर्षांनी मृत्युमुखी पडल्यावाचून गती नाही. जन्म पण आनंददायी वाटतो परंतु मृत्युची कल्पना सुद्धा सहन होत नाही. एक दिवस मरावयाचे आहे हे ज्ञान (Knowledge) लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना आहे परंतु जन्म मरणापासून सुटण्याचा उपाय करणे मात्र प्रत्येकास कडू वाटते. कारण पाण्याच्या बाहेर आलेल्या माशाला ज्याप्रमाणे पाण्याचे महत्व कळते त्याप्रमाणे एक दिवस "मृत्यु" आपणास गाठणार हे माहीत असूनसुद्धा आम्ही मानव तो मृत्यु डोक्यावर येऊन उभा राहीतोपर्यंत जागे होत नाही असा "या जीवाचा" अट्टाहास करीत असतो.

प्रपंचात ज्या जीवाचा जितका जास्त व्याप असतो तितकाच संताप व दुःख होते. ज्याप्रमाणे ऐन तारुण्यात तरुण स्त्री संसार उधळून गेली की दुःख होते त्याचप्रमाणे ज्यांचा प्रपंच समृद्धीने पूर्ण सुशोभित आहे अशा जीवाच्या कुटुंबात परस्पर अहंतेचा व प्रेमाचा मोहजाल विस्तृत होतो. तरी पण अशा पुरुषावर किंवा त्या जीवावर काहीतरी रोग होऊन "मृत्यु"ची झडप पडताच पिता, माता, पत्नी, स्वजन, बंधूवर्ग, इष्ट मित्र, आश्रीत व नोकरचाकर यांचा "गराडा त्या जीवाच्या देहा सभोवार पडतो. शुद्धी असे पावेतो "तो जीव "मला प्राणदान द्या असे एकसारखे डॉक्टरला अपार द्रव्य देऊन जीवदान मिळविण्याची एकसारखी विनवणी करीत असतो. आपल्या निरनिराळ्या नातेवाईकांना हाक मारतो. अशावेळी हा जीव "गुरुला" हाक मारीत नाही कारण मोहजाळामध्ये गुरफटलेल्या प्रेमाला तो खरे प्रेम समजतो व कविने वर्णन केल्याप्रमाणे प्रेमाची किंमत खरी किती व खोटी किती हे तो (जीव) ज्ञात करू शकत नाही कारण बाबा सांगतात :—

जगतमें प्रेमही प्रेम भरा है ॥
प्रेम बिना यहां कछु न धरा हैं ॥
देख मायाको लुभाया तू ॥
फस रहा है अय मुसाफीर ॥
छुटना चाहे तो छुट सके तू ॥
जान. ले प्रेम क्या है ॥

म्हणून ज्याचे गुरुवर आत्मवत प्रेम आहे तोच एक 'मृत्युरूपी सुखाचा शोध लावण्यासाठी गुरुच्या परिक्षेत उतरतो आणि गुरुकृपेचा अधिकारी होतो.

गुरुवरील प्रेमाला खरी ज्ञान लालसा हीच कारण आहे परंतु हा जीव त्याप्रमाणे करीत नाहीं व उलट तो आपले इष्टमित्र – जीवश्च – प्रेमीलोक यांना एकसारखी विनवणी करीत असताना या "मृत्युच्या पाशा" पुढे जमलेल्या सर्व लोकांचे प्रेम निष्फळ ठरते. सर्व औषधोपचार निष्फळ ठरतात. प्राण क्षीण होत जातो. त्या आसन्न मरण "प्राणप्रीय" जीवाच्या शरीरास स्त्रीयेचा, मान पित्यांचा तसेंच संतति मित्र वगैरे संबंधीत सर्व मंडळींचा विळखा पडतो. हे सर्व लोक कंठ फोडून ढसढसा रडू लागतात. आपल्या अश्रूनी त्या जीवास भिजवितात कित्येकांची काळजे चरचर कापू लागतात व ते मूर्च्छीत पडतात. आता सर्वस्व बुडाले. देवा कसारे आमचा नाश केलास असे मोठमोठ्याने त्या परम कृपाळू देवाच्या नावाने खडे फोडतात. प्रत्येकजण आपापल्या परीने शोक करीत, त्या "आवडत्या जीवाचा" मृत्युमुळे संबंध तुटला म्हणून मातीमय झालेल्या त्या आवडत्या जीवाच्या देहाला मूठमाती इतक्या तत्परतेनें व लवकरात लवकर देतात की त्या जीवाला या लोकांचे इतक्या वर्षांचे इतके प्रेम इतक्या लवकर कसे नाहीसे झाले याबद्दल अचंबा वाटतो व तो जीव "बाबांना" (निर्गुण निराकार भगवंतास) सांगतो की मी (जीव) समृद्धीने पूर्ण अशा सुखात जरी वावरलो व ज्यांना मी आपला समजलो ते सर्व परके ठरले. "अपने कोन और पराये कोन" याचा अर्थ समजू शकलो नाही. हे भगवंत मी खरोखरच सुखी नव्हतो. ज्यास मी सुखाचे साधन समजलो ते एक मृगजळासारखे स्वप्न ठरले व मी समजलो तेही मृत्युचे आमंत्रण स्विकारतेवेळी मी (जीवाने) म्हटले :—

मी अन्यायी – अन्यायी ॥  
किती म्हणोनी सांगू साई ॥  
बालपण खेळांत रंगले ॥  
तरुणपण विषयांत दंगले ॥  
सायासें नरदेह लाभला ॥  
सार्थक केले नाहीं ॥

हे समजत असताच जीवाचा प्राणोत्क्रमणाचा समय आला हे समजते. शरीर जड होत जाते. पृथ्वी तत्त्वाचा लय पृथ्वी तत्त्वात होतो. घाम खूप सुटतो. रुधिरादि शुल्क होतात. यावेळी जलतत्त्वांचा नाश होतो. दृष्टी भिजून अंगाचा उष्मा व नाडीचा वेग कमी होत जातो व यामुळे शरीरातील अग्नीचा लय होतो. शेवटी प्राणवायू तुटत तुटत नाहीसा होतो व हा जीव पंचतत्त्वात जातो.

याप्रमाणे परमार्थाचा कल्लोळ होतो. प्रेताची ओढाताण होते. प्रीय आप्तजन सगे सोयरे — इष्ट मित्र या सर्वांचे प्रेम दूरावत जाऊन मृत्युमुखी पडलेल्या या जीवाच्या शरीराला चिताकुंडात पूर्णाहूती देऊन सर्व मंडळी घरी प्रेमानुरूप पर्यायाने शोकात मग्न होतात. शोक करण्याशिवाय कोणालाच काही करता येत नाही. काहीकाळ हा जीव आपले ठिकाणा भोवती भटकत असतो परंतु कालमानाने तो (जीव) पुढे आपली यात्रा सुरू करतो. त्याच्या आश्रयातील एखादे कुत्रेसुद्धा त्याचेबरोबर जात नाहीं. म्हणून श्री सद्‌गुरु बाबा भक्त मंडळीस सांगतात — हे भक्तजनहो मी जिवंत असताना व माझे मृत्यु (समाधि) नंतर तुम्हांपैकी हजारो लाखो करोडो भक्तजन काहींना काही मागणे घालण्यास माझे दरबारात येता परंतु "मृत्युरूपी सुखा" संबंधी काही विचारीत नाहीं म्हणून मी तुम्हांस सांगतो की ज्याप्रमाणे जमिनीत मूळचे पाणी असतेच पण तें मिळविण्यासाठी वरचे दगड मातीचे दडपण जसे काढावे लागते त्याप्रमाणे हा जीव मूळातच सुखरूप आहे परंतु सुखरूपतेचा अनुभव घेण्यासाठी त्यावरील "कुसंस्काराचे" दडपण गुरुबोधाद्वारे काढून टाकावे लागते. परंतु हा जीव त्याप्रमाणे काहीएक प्रयत्न करीत नाहीं कारण ज्याप्रमाणे पैसा-द्रव्य हे कोशा-गारात असते, पशु गोठ्यात असतात, पत्नी घरात असते, व जीव विरहित देह चितेमध्ये असतो. त्याप्रमाणे हा जीव फक्त घरात राहण्याचा खटाटोप करतो व खरे सुख शोधण्याचा प्रयत्न करीत नाहीं. मनुष्याने विषयात निमग्न होऊन रहाण्यापेक्षा आत्म्याशी एकरूप होऊन राहणे श्रेष्ठ म्हणून मनुष्याचे शरीर हा रथ आहे. जीव हा सारथी आहे व अनंत वासना हे घोडे आहेत. वासना प्रबळ होत जातात. जन्मरूपी बीजाचे मरणरूप फल होणे. जन्माने मरण व मरणाने जन्म ही अखंड परंपरा चालली आहे हे जाणून "मरे एक त्याचा दूजा शोक वाहे अकस्मात तोही पुढे जात आहे. या निसर्गाचे तत्वानसार जरी मी हे शरीर टाकून गेलेलो असलो तरी माझी हाडे माझे तुर्बतीतून (समाधीतून) तुमचेशी बोलतील यावर पूर्ण श्रद्धा ठेवा व ही अनमोल सेवा तुम्ही भक्तमंडळी आता पावेतो करीत आला आहात तीच सेवा "मृत्यू"ची शंका मनात न ठेवता अगदी सरळपणे आपला सेवाभाव उज्वल करा. कारण समुद्र जसा पावसाळ्यात भरून वाहून जात नाही किंवा उन्हाळ्यात आटत नाही त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष इहलोकीचे वैभव प्राप्त झाले असता हर्षाने फुलून जात नाही किंवा त्या वैभवाचा नाश झाला तरी खेदही करीत नाही. तद्वत तुम्ही भक्तमंडळी मृत्युविषयी पूर्ण विचार करू लागलात तर तुम्हाला खात्री वाटू लागेल की जरी मी हे शरीर टाकून गेलो आहे तरी तुमचे (भक्तमंडळीचे) इच्छेप्रमाणे तुम्हास केव्हाही भेटू शकेन व "मृत्यु आणि बाबा" या विषयी

तुम्हास खात्री पटून संशय रहीत मन होईल व एक प्रकारचा आनंद तुम्ही लुटू शकाल. ज्याप्रमाणे वाघ, सिंह आदि हिंस्त्र पशु आपला क्रूरपणा सोडून माणसाळले म्हणजे त्यांना पहाण्यासाठी जशी लोकांची गर्दी होते त्याप्रमाणे तुमच्यातील विकार जाणून तो दैवी गुण संपन्न झाला म्हणजे मृत्युविषयी मुळीच चिंता उरत नाही व त्याच्या ठिकाणीसुद्धा माणसांची गर्दी होते व त्यावेळी या जीवास पटते की :–

"जगी सर्वसुखी असा कोण आहे विचारी मना तूंची शोधोनि पाहे." व त्याप्रमाणे या जीवाने प्रयत्न केला म्हणजे त्यास सर्वज्ञ सर्वेश्वर, सर्वव्यापी भगवंत चराचरात भरलेला असून जन्म वेळेपासून मृत्यु येई पावेतो या जीवास एकच दिसू लागतो.

तूज सगुण म्हणू कीं निर्गुण रें
सगुण निर्गुण एक गोविंदु रे
एक साई रे

● ●

# ॥ जया मनि जैसा भाव। तया तैसा अनुभव ॥

श्री. विजयसिंग शंकरसिंग परदेशी
३६७, शनिवार पेठ, सातारा

काही महिन्या पूर्वीचा चमत्कार मी माझ्या बहिणीस भेटण्याकरिता सातार्‍यावरुन संगमनेरला अंदाजे ५।६ महिन्यापूर्वी चाललो होतो. पुण्यावरुन नाशिक एस. टी. ने प्रवास करीत असताना विचार करीत होतो की, संगमनेरला गेल्यानंतर आपले पाहुणे श्री. शंकरसिंग वा. परदेशी (म्युनिसिपल कौन्सीलर) यांची स्वतःची मोटार सायकल आहे ती उद्या सकाळी काढावयास सांगून शिर्डी देवस्थान नजिक आहे, दर्शनास जाऊन यावे. असे विचार प्रवासात करीत मी संगमनेरला पोहोचलो. रात्री जेवण वगैरे झाल्यानंतर पाहुण्यांचे जवळ शिर्डीस जाण्याचा विषय काढला तो सत्य परिक्षा अशी की त्यांच्या भावानी त्यांची मोटारसायकल एक महिन्याकरिता परगावी नेली होती. मग मात्र मी पूर्ण विचार करुन निश्चय केला की एस. टी. मध्ये ठरविल्याप्रमाणे उद्या सकाळीच स्नान वगैरे उरकून एस. टी. ने शिर्डीस जावून यावयाचेच. त्याप्रमाणे दुसरे दिवशी सकाळीच नित्यकर्म स्नान वगैरे उरकून चहा घेवून बहिणीस विचारुन सकाळी ९ वाजता बाहेर पडलो.

चालतच एस. टी. स्टँडच्या नजिक आलो, मनःस्थिति उत्तम अंगी उत्साह व बाबांच्या दर्शनाची उत्कंठा. स्टॅण्ड साधारण १०० पावलावर असेल इतक्यात चालत असतानाच मला अत्यन्त जोरात ठसका आला. छातीत साधारण कळ आली व एकदम जोरात उचकी चालू झाली मी जरासा थांबलो परंतु उचकी बंद होईना. इतक्यात मला आठवण झाली व मी माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे श्री साईबाबांचे स्मरण व नाम घेवून त्यांना जरा चिडूनच बोललो जरा धीर धरा मी येतच आहे. तुमच्या भेटीस पवित्र दर्शनास व चमत्कार असा की एक सेकंदात उचकी व ठसक्यामुळे लागलेली धाप थांबून मला प्रसन्न वाटू लागले. मनोभाव असल्यानंतर भक्तांच्या भेटीकरिता साक्षात् अनंतरूपी परमेश्वरास (श्री बाबाना) चुटपुट, आतुरता लागते.

मला ताबडतोब एस. टी. मिळाली व मी पुण्यभूमी शिर्डीत पोहोचलो. यथाशक्ति अभिषेक केला प्रदक्षिणा घातल्या. इतक्यात दुपारची आरती चालू झाली ती घेतली. दरबारातील आरतीचा सोहळा पाहुन नेत्रातून आनंदाश्रु नंतर श्रीबाबांना भक्तिपूर्वक नमस्कार करून जड अंतःकरणाने त्या पुण्य दिव्य नगरीतून निरोप घेतला लगेच गाडी मिळाली व मी संध्या. ५ वा. संगमनेरला आलो. ● ●


**येत्या गुरुपौर्णिमेस**
**पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे—**

## ० श्री साईनाथ ०

**( श्री साईलीलेतून क्रमशः प्रसिद्ध झालेले ललित चरित्र )**

लेखक : **र. श्री. पुजारी,** पुणे

- सुधारित व वाढीव आवृत्ती. पृष्ठे सु. ३२५ डेमी
- प्रकाशनपूर्व सवलतीची किं. रु. **दहा+** प्रत्यक्ष व्ही. पी. खर्च (एका प्रतीस)
- **नोंदणीची अखेरची मुदत : ३० एप्रिल ७६**
- १ मे १९७६ पासून किं. रु. **पंधरा+**प्रत्यक्ष व्ही. पी. खर्च ( एका प्रतीस )
- मनिऑर्डरने **आगाऊ** पैसे पाठविण्याचा पत्ता : **र. श्री. पुजारी,**

जयश्री प्रकाशन, ( पेरुगेट **मुलांच्या** भावे स्कूलसमोर )
९९२ सदाशिव पेठ, पुणे–३०

**वि. सू.** ● पैसे भरल्याची सही–शिक्क्याची पावती आवश्यक.
● नोंदणी वरील पत्त्यावर सुरू झाली आहे.

# श्रीसाई-महिमा

• **डॉ. अनिल जायस्वाल**, नागपूर-२



संयम व सदाचाराद्वारे वासनेचा क्षय शक्य आहे. वासनेच्या विनाशोपरातच निर्वासिनावस्थेतच ईश्वर चिंतन शक्य आहे.

ईश्वराने दिलेल्या शक्ती, संपत्ती व काळाचा सदुपयोग करणारा मनुष्य देव. दुरुपयोग करणारा मनुष्य दानव.

सुखभोगोपरान दुसऱ्यास सुखी करणारा 'सज्जन' आहे. परंतु तो 'संत' नाही. स्वतः दुःख, कष्ट व क्लेश सहन करून दुसऱ्यास सुखी करणाराच 'संत' आहे.

सूर्य हा बुद्धीचा स्वामी आहे; तर चंद्र हा मनाचा. बुद्धीच्या शुद्धीकरणार्थ श्रीरामाचे चरित्र रचिले गेले आहे. मनाच्याचरित्र शुद्धीकरणार्थ श्रीकृष्णाचे रचले गेले आहे. परंतु मन व बुद्धि या दोघांच्याहि शुद्धीकरणार्थ जे चरित्र रचिले गेले तेंच 'श्रीसाईसच्चरित' आहे.

श्रीरामाची मर्यादा पालन केल्यास मनातील काम व वासना पार नाहीशी होते. अर्थात रावण ठार होतो. या कामवासनेच्या विनाशानंतरच श्रीकृष्णाचे आगमन शक्य असते. श्रीरामावतारानंतरच श्रीकृष्णावतार झालेला आहे. श्रीरामानंतरच श्रीकृष्ण येत असतात.

परंतु या सर्वांआधी 'श्रीसाई-उपासना' केल्यास श्रीराम व श्रीकृष्ण हे दोघेही मागे-पुढे न येता बरोबरीनेच येऊ शकतात. ईश्वरसेवेत जो आपले शरीर खर्ची घालतो त्या व्यक्तीचा देहाभिमान समूळ नाहीसा होतो. भक्ती मार्गात तन वा धनाऐवजी मनासच प्राधान्य आहे. जेव्हापासून धनास प्राधान्य लाभले, तेव्हापासूनच भक्ती छिन्न-भिन्न अवस्थेस पोचली.

ईश्वरसेवेत धनापेक्षा मनालाच महत्व जास्त आहे. वासनेस विवेकतेने भक्तिमार्गास वळविल्यास तीच 'सद्‌गुरु श्रीसाई उपासनेचा' आकार घेत असते. धर्माद्वारे स्थूल वासनेचा ऱ्हास होत असतो. परंतु मन व बुद्धीतील सूक्ष्म वासनेचा क्षय होत नाही धर्माद्वारे मन व बुद्धीत वसत असणाऱ्या सूक्ष्म वासना नष्ट होणे – हे अत्यंत कठीण व अवघड आहे.



श्री साईसमर्थांच्या भक्तिद्वारे या सर्व वासनांचा विनाश होणे सुलभ व शक्य आहे. सर्वप्रकारच्या स्थूल व सूक्ष्म वासना श्रीसाईबाबांस शरण आल्यावर पूर्णपणें नष्ट होत असतात – हे निश्चित जाणावे. ही सोपी, सरळ व सुलभ साधना शरणागतांस प्रदान करण्यासाठीच श्री साईबाबा अवतीर्ण झाले.

सूर्य व चंद्राच्या उपासनेशिवाय बुद्धिगत वासनेचा ऱ्हास होणे अशक्य आहे.

सूर्य व चंद्र हे दोघेही श्री साईसमर्थात सामावलेले आहेत. श्रीसाई समर्थांच्या उपासनेशिवाय इंद्रियगत, बुद्धिगत, व मनोगत या सर्व वासनेचा क्षय होणें या कलियुगात तरी अशक्यच आहे.

या संसारात राहूनसुद्धा सद्गुरु श्रीसाईबाबाप्रमाणे आपल्या मनात या सांसारिक विषयांचा प्रवेश निषिद्ध असावयास पाहिजे. असे केल्यावरच श्रीसाई-माऊली प्रसन्न होईल.

श्रीसाईलीलेचे श्रवण फार भाग्याने लाभत असते. श्रीक्षेत्र शिर्डी-समाधी मंदिरातील श्रीसाईंचे दर्शन लाभणाऱ्या व्यक्तीचे भाग्य थोर होय. हे सर्व प्रारब्धानुसार व श्रीसाईंच्या कृपाशीर्वादानुसारच शक्य आहे.

श्रीसाईकथा श्रवण करणे हे एक पुण्य कर्म आहे. इतर सांसारिक कर्मांचे फळ तर आपणास कालांतराने मिळते. परंतु श्रीसाईकथा श्रवणाचे फळ शीघ्रच लाभणारे असते.

सांसारिक विषयांचे विस्मरण व श्रीसाईंशी तन्मयता हेच श्रीसाईचरित्र वा श्रीसाईलीला श्रवणाचे फळ आहे.

ज्या मडक्यात तेल ठेवले जाते ते मडके दहादा धुतल्यावरही तेलाचा वास जाता जात नाही. अशा मडक्यात कधी दही जमविता येणे शक्य तरी आहे काय ? तेलासाठी उपयोगात आलेल्या मडक्यातील दूधसुद्धा नासते.

मानवी अंतःकरणाचीही अवस्था हीच आहे. मागील कित्येक वर्षांपासून 'काम-वासना' रूपी तेल त्यात संग्रहित करण्यात आलेले आहे. या बुद्धिरूपी पात्रात 'श्रीसाई'रूपी रस संचित करावयाचे आहे. या हृदयरूपी मडक्यात काम किंवा वासना अंशतःही राहिल्यास 'प्रेमरस' वा 'भक्तिरस' जमण्यास बाधा उत्पन्न होत असते. कारण 'भक्तिरस' अशा अंतःकरणाच्या संपर्कात आल्यावर तो सुद्धा नासले जाते. मानवास नासलेले पदार्थ कधीही आवडत नाहीत. ईश्वरासही आपली नासलली भक्ती व नासलेले प्रेम मुळीच आवडत नाही.

बुद्धी स्थिर व शुद्ध ठेवण्यास, मनाचा स्वामी जो चंद्र व बुद्धिचा स्वामी जो सूर्य यांची आराधना करावी लागते. 'श्रीसाई'च्या आराधनेद्वारे बुद्धी स्थिर व शुद्ध होत जाते.

ज्याच्या घरी राम नाही त्याच्यातील रावणरूपी 'काम' मरणार नाही. त्या रावणास ठार करणे अत्यावश्यक व आपल्या हिताचे आहे. श्री साईरामा-च्या मर्यादेचे पालन केल्यावरच रावणाचा अंत होणे शक्य आहे.

वाटेल त्या संप्रदायात व धर्मात आपली निष्ठा असो, श्रीरामाच्या मर्यादेचे उल्लंघन केल्यास 'आनंद-प्राप्ति' शक्य नाही. अल्प संपत्ती वा अधिकार मिळता-क्षणीच मानवास श्रीरामाच्या मर्यादेचे विस्मरण होत असते. मर्यादेचे उल्लंघन न करणे हीच श्रीसाईरामाची सर्वोत्कृष्ट सेवा आहे. श्रीसाईसमर्थांच्या आचरणाचे अवलंबन करणे म्हणजेच त्यांची मर्यादा राखणे होय.

श्रीसाईबाबांचे व्यवहार व वर्तन आपण आपल्या आचरणात उतरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांचे चरित्र सर्वथा अनुकरणीय आहे.

श्रीकृष्णाच्या सर्व लीलांचे अनुकरण करणे मानवी शक्तीच्या आटोक्याच्या बाहेरचे आहे. ते सर्व अशक्य आहे. त्या श्रवणीय व चिंतनीय आहेत. चिंतना-ारे तन्मयता लाभणे शक्य आहे.

श्रीरामचंद्रासारखे आचरण ठेवण्याचा प्रयत्न करणे आपणास हितप्रद असते. श्रीरामाचे चरित्र मानवी-कृतीत उतरविण्यासाठी तर श्रीकृष्णाचे चरित्र. म्हणून त्याचे चिंतन करणे आवश्यक आहे.

सच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईबाबांचे चरित्र चिंतनीय असून ते कृतीत उतर-विण्यासारखे आहे. श्रीसाईराम मर्यादा पुरूषोत्तम असून मानवापुढे ते आदर्श ठेवतात. श्रीरामाचे मातृप्रेम, पितृप्रेम, बंधुप्रेम, एक-पत्नीव्रत आदि सर्व काही जीवनात उतरविण्यास योग्य आहे. रामायणातील सर्वच पात्रे आदर्श आहेत. राजा श्रीदशरथाचे पुत्रप्रेम, सीतामातेची पतिभक्ति, भरत व लक्ष्मणाचे बंधुप्रेम आदी सर्वच आदर्श आहे.

श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम तर श्रीकृष्ण पुष्टी पुरुषोत्तम आहेत. श्रीकृष्ण लोणी अर्थात मृदुमनाचे चोर होते. ते साधकांपासून सर्वस्वाची अपेक्षा करतात. 'राम' शब्दात एकही जोडाक्षर नसून 'कृष्ण' शब्दात प्रत्येक अक्षर जोडाक्षराच्या समन्वयाने बनलेले आहे. श्रीरामाचा जन्म दुपारी बारास तर श्रीकृष्णाचा रात्री बारास झाला. श्रीराम राजा दशरथाच्या भव्य राजप्रसादात अवतीर्ण झाले तर श्रीकृष्ण कंसाच्या कारागृहात जन्मले. श्रीराम हे मूर्तिमंत मर्यादा होत तर श्रीकृष्ण हे प्रेम आहेत.

मर्यादा व प्रेम यांचे सम्मीलित रूप म्हणजेच साक्षात ईश्वर वा 'साई

श्रीसाईनाथांचे चरित्र हा एक अथांग सुखाचा सागर आहे. यास आपण 'श्रीसाई-सुख-सागर' हे काव्यात्म नाव देऊ शकतो. या सागराच्या विस्तार व खोलपणा याविषयी अंदाज वा कल्पना करण्यास मानवी मन वा बुद्धी पूर्णत असमर्थ आहे. यात वारंवार बुडी मारणाऱ्या मानवास एकाच स्थळी वेगवेगळा आनंद अनुभवण्यास मिळतो. या अफाट पवित्र सागरात बुडी मारणारी व्यक्ति मानवावरच काय पण पशूवर देखील प्रेम करू लागते.

श्री साईसमर्थांच्या चरित्रात कलीयुगी मानवाने कसे जीवन जगावे याची उत्कृष्ट शिकवण आहे.

ज्याप्रमाणें श्रीरामचंद्रप्रभूनी आपले ऐश्वर्य लपवून मानवी जीवनाचे आकर्षक व चित्तवेधक नाटक रचले, त्याचप्रमाणे निराकार व निर्गुण असणाऱ्या साक्षात ईश्वराने साईरूपी फकिरीबाण्यात शिर्डीच्या मशिदीत वास केला.

हल्ली 'समाधी' असणाऱ्या जागेवरच श्रीबाबांची बाग होती. स्वहस्ताने तिथे त्यांनी फुलझाडे लावली. राहत्यातूनही अनेक कलमे आणून त्यांनी लावली. त्या सर्व वृक्षांना परिश्रम करून स्वहस्ताने श्रीबाबा नित्यनेमाने पाणी घालीत.

सीतामातेने नारीधर्माचा व भारतीय संस्कृतीचा आदर्श पुढे ठेवला स्त्रियांसाठी पती म्हणजेच परमेश्वर होय.

अग्निनारायणाने सीतामाईस निर्दोष ठरविले. पण श्रीरामाने मानवी राजाच्या आदर्श लोकांपुढे ठेवण्यासाठी एका परटिणीच्या आरोपास मान देऊन सीतामातेचा त्याग केला.

हा 'अमर-त्याग' सतत दृष्टिसमोर राहावा म्हणूनच की काय श्रीसाईसमर्थांनी आपल्या गादीसमोरच 'अग्निनारायणास' स्थान दिले. मशिदीतील या अग्निदेवतेलाच 'धुनीमाता' म्हणून संबोधण्यात येते. श्रीसाईबाबांच्या यौगिक क्रियेद्वारे प्रज्वलित झालेली 'द्वारकामाईची' ही 'धुनीमाता' आजही अखंडपणे तेवत ठेवण्यात आलेली आहे. धुनीमातेचा पावन अंगारा श्री साईबाबांच्या कृपाशीर्वादरूपानेच आपणा सर्वांना आजही उपलब्ध आहे.

आपण तो ग्रहण करू या.

● ●

# वाऱ्यावरचे विचार

● द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे

## १८ दह्यातला कावळा

एक होता कावळा. रंगाने काळा. कावकाव करणारा. कावळा नोकरी करीत नाही की काम धंदा करीत नाही. स्वतंत्र वृत्तीचा तो. तो काय कुणाचा गुलाम होणार ? डल्ला मारून पोट भरी. एकाक्ष पण तीक्ष्ण नजरेचा आमचा हा कावळा मोठा हुषार होता. होरा असा वाहतो की हा मूळचा मराठा असावा. मराठे रातोरात तर हा हातोहात छापा घालून हाताला लागेल ते नव्हे चोचीत मिळेल ते घेऊन पसार होई, मोठा गनीम होता. हिंदूंच्या वेडगळ समजूती व विचार यांचा फायदा उठवण्यात तरबेज होता. हा छापा मारी. म्हणजे काय करी? सांगू, सांगतोच. स्वयंपाक घराच्या खिडकीच्या तो तावदानावर बसे. काव काव करी, ज्ञानेश्वराच्या एका अभंगाचा त्याने अभ्यास केला होता.

उड उड रे काऊ. हिंदूंचा भोळा समज त्याला माहीत. काव काव ऐकले की अमुक येणार उडून जा, पाहुणा येणार उडून जा असा शकून ते मागतात. काऊ कोकलताहे सगुण माये सांगताहे. दही भाताची हंडी लावीन तुझे तोंडी. माहेरचा कोणी येऊ दे. असे गृहिणी मनात म्हणतात. तेवढ्या वेळात तो निरीक्षण करी.

तो असाच एक दिवस खिडकीवर बसला होता. काव काव करू लागला. लगेच ठराविक सोपस्कार चालू झाले. हा एकाक्ष आपल्या एका डोळ्याने खाद्य पदार्थाकडे पहात होता, कुठे काय ते हेरले. पण गृहिणी होती. तितक्यात एक मिरवणूक आली. ती पहायला गृहिणी बाहेर पळाली. कावळा आत आला. त्याला दह्याने भरलेली एक हंडी दिसली. माऊली आठवली – दह्याची हंडी लावीन तुझे तोंडी. माऊलीचं म्हणणं मग काय ? बसला हंडीच्या काठावर व चोचीने दही खाऊ लागला. (पूर्वी हंड्या असत. आता बारकी बकर्म) तोल गेला. दह्यात डुबला. घाबरला. कसा बसा बाहेर आला व कोणी पहाण्याच्या आत धडपडत बाहेर पळाला. जातभाईंच्या कळपात गेला. पांढऱ्या पायाचा परका पाहून कावळ्यांनी गिल्ला केला व टोचून टोचून त्याला हाकलला. पळाला बिचारा. एके ठिकाणी काही हंस पिले खेळत होती. त्यांच्यात शिरला. अज्ञानी बालकं त्यांना वाटले आपलेच कोणी चाच्या असतील. त्यांनी त्यांची उत्तम बरदास्त ठेवली. कावळा आनंदात राहिला. पण हंसाचे अन्न का त्याला चालतं ? कुठेतरी चोरून जाई व नासकं कुसकं खाऊन येई. पिलांना आश्चर्य वाटे की काका मुके कसे ? (कावळ्याने मौनव्रत घेतले होते) एक दिवस पिलांचे वडील आले. तो खराखुरा राजहंस होता. रंगसफेती लावून झालेला नव्हता. आला तो सरळ पाण्यात शिरला व मजेने पोहू लागला. पिलेही पिताजी मागोमाग पोहत गेली. त्यांनी चाच्यांना आग्रह केला. ती त्याला ओढू लागली. कावळा कातावला. कावकाव करू लागला. बेंड फुटलं. त्या लफंग्याला राजहंसाने टोचून टोचून तडीपार लावलं. असे लुच्चे राजहंस समाजात नेहमीच घुसत असतात. ब्रम्हांड कोटी नायक ते. खरं आहे. किती कोटींना त्यांनी ब्रम्हांड आठवायला लावले असेल ते त्यांनाच माहित. अपघातानं अध्यात्मात पडतात व मग राख फासून राजहंस होतात. भोळ्या भाबड्या अज्ञानी जनतेच्या भोळसटपणाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडणं, नागवणं हा यांचा धंदा. _या ढोंग्यांना व माणुसकीच्या मारेकऱ्यांना पार तडीपार करणारा एकादा राजहंस केव्हा जन्मास येईल ?

## १९ सलून

केस कापवून घेण्यासाठी सलूनमध्ये गेलो. सुदैवाने खुर्ची रिकामी होती. खुर्चीत बसलो. समोरच्या आरशात पाहिले. तो चकित झालो. अनेक अस्मादिक दिसत होते, किती म्हणाल तर सांगणं कठिण. दृष्टी पोहोचेतोपर्यन्त अस्मादिकच. पुढे पुढे ते अंधुक होत विरळ होत गेले. दिसलं नाहीं म्हणून पुढे नाहीं असं कां म्हणा ? दृष्टी तोकडी पडते. शेजाऱ्यांकडे आजुबाजूला पाहिले. पाठीकडे पाठ असलेल्या ५ खुर्च्यांच्या दोन ओळी. प्रत्येक खुर्चीपुढे एक मोठा आरसा. पुन्हा आरशात पाहिले तो एकाची अनेकरूपे. वीतभर खोलीत दृष्टीपथात येणारी शंभर नव्हे असंख्य माणसे असावीत. १० चे १०० झाले. वीतभर खोली हातभर झाली. दहा खुर्च्या, दहा माणसे, दहा कलाकार व एक पोऱ्या एवढी माणसं पण दिसायला सभेची गर्दी. मूळचा 'मी' एक असताना आरशात मात्र अनेक रूपे. रूपे पुष्कळ पण मूळचा मी एकच. काम झाल्यावर केस कपात कशी काय झाली आहे हे पहाण्यासाठी दुसऱ्या आरशांत पाहिले. तो मलीन होता. पहातो तो चेहरा मलीन दिसला. म्हणून हातरूमालाने तो पुसला. पण आरशात तो मलीन दिसतच राहिला. शेजारी एक फुटका व भिंग खराब झालेला आरसा होता. त्यात पाहिले तो चेहरा लांबट. एकदम लांबट दिसला. समजलो, आरसा खराब म्हणून असं. आरशातील प्रतिबिंबास होणारे विकार मूळच्या एकाला बाधक होत नाहीत हे ध्यानात आलं. बाहेर पडलो (अर्थात पैसे चुकते करून. चुकवून नव्हे.) विचार फडफडू लागले. हे सर्व विश्व म्हणजे आरशातील प्रतिबिंबच तर नव्हे ? मायेच्या आरशातील सर्व प्रतिबिंबे त्या 'एकाची'च पण बिंबातील चांगले वाईट विकार त्या 'एकाला' बाधक होत नाहीत ते त्याच्यावर परिणाम करू शकत नाहीत. तो 'एक' अलिप्त आहे. रोज आपण आरसा वापरतो व जाणतो की समोरचे जे आहे ते आपलं प्रतिबिंब आहे. ते खरे नव्हे. आपण खरे. पण मायेने आपले भान नाहिसे केलेले असल्यामुळे हे भान विश्वाबद्दल आपणास होत नाही व प्रतिबिंबाच सत्य समजून त्याच्या नादी लागतो व 'एकाला' विसरतो. आरसा फुटला की प्रतिबिंब नाहीसे होते. होते मग गेले कुठे ? येणे नाही मग जाणे कसं असणार ? बद्धताच नाहीं मग मुक्ती कुठली ? इंद्रिये जे जे दाखवतात ते ते निव्वळ भास भ्रम असतो. शब्दात पकडताना येणारे जे ते शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला आहे. जमलं नसेल पण किंचित तरी समजूत पटेल. होय की नाहीं ? बस्स. पुष्कळ झालं.

## २० कोष

तो एक पाचवीतील विद्यार्थी होता. अभ्यास सांभाळून इतर अनेक विषयांचे ज्ञान मिळविण्याची त्याला फार जिज्ञासा. फुलपाखरे त्याची फार आवडीची. फुलपाखरे पकडण्याचा लहानपणी त्याला भारी नाद होता. एकदा त्याने कुठेतरी वाचले की तुतीच्या झाडावर जे किडे असतात त्यांपासून रेशीम मिळते. झालं. तो छंद त्याने घेतला. जरूर ती सर्व माहिती मिळविली. त्या घराच्या परसात एक तुतीचे झाड होते. त्यावर किडे होते. त्याने प्रयोग करुन पाहिला. यशस्वी झाला. आनंद झाला त्याला. मग दुसरा किडा आणून डब्यात ठेवला. मला तो दाखवला. पूर्वीचा कोषही दाखवला. काहीं दिवसानी तो आनंदाने धावत आला. व म्हणाला चला. तुम्हाला एक गंमत दाखवतो. मी त्याच्या बरोबर गेलो. त्याने माझ्यादेखत डबा उघडला तो काय आश्चर्य, त्यातून एक फुलपाखरू भुर्रकन बाहेर उडाले. किड्याचे फुलपाखरू झाले. शिल्लक राहिला रिकामा कोष व त्याला असलेले तंतू. विचार फडफडला. काय देवाची किमया आहे पहा. लगेच वाटलं. माणसं किड्या सारखच करतात नाहीं ? पक्ष जाति धर्माच्या कोषात स्वत: स्वत:लाच बंदिस्त करून घेतात व पक्ष, गट, संघ गाव वगैरे नाना कोष निर्माण करतात. कुटुंब हा ही एक कोषच. एका कोषाचा दुसऱ्या कोषाशी संबंध नाही. व्यवहार नाही, देवघेव नाही. जो तो स्वतंत्र. प्रत्येक कोष आपल्या पायापुरते पहातो. कोषाकोषांचे संबंध आलेच (व्यवहारात तसे येणारच) तर संघर्ष भांडणतंटे होतात. कोषात ज्याचे त्याचे स्वतंत्र आकाश. विशाल आकाश कोणासही दिसत नाहीं. मग लहान मोठे संघर्ष बंद कसे होणार ? माणसाच्या वासना, ईच्छा, आकांक्षा आपल्या पूर्तीसाठी देहाच्या कोषात स्वताला गुंडाळून घेतात व ज्यायोगे आपले काम साधेल तेवढेच तो जगात शोधतो व मिळविण्याचा प्रयत्न करतो. या व्यतिरिक्त इतरांशी त्याला काहींही कर्तव्य नसते. कालांतराने या कोषातून जीवात्म्याचे फुलपाखरूं भुर्रकन उडून अवकाशात कुठच्या कुठे निघून जाते व रिकामा कोष, निर्जीव शरीर तेवढे मात्र इतरांसाठी मागे शिल्लक राहते. पण असा एक कोष आहे कीं त्यात स्वत:ला गुंडाळून घेतले तर संकुचीत वृत्ति न होता ती इतकी विशाल होते कीं तिच्यात मानव जातच नव्हे तर सर्व प्राणीजात समावली जाते. असा कोष म्हणजे अध्यात्म.

● ●